# विंचू चावला तर



रामूचे बाबा कुंपणाचे दगड लावत होते. रामू त्यांना मदत करीत होता. दगड उचलण्यासाठी बाबांनी दगडाला हात घातला इतक्यात—

ते ओरडले. बाबांनी हात जोराने झटकला. आवाज ऐकून रामूची आई बाहेर आली.

रामूच्या बाबांनी लाथेने दगड ढकलला. दगडाखाली विंचू होता. रामूच्या आईने वहाणेने विंचू मारला.



© होमी भाभा विज्ञान शिक्षण केन्द्र, मुंबई-४००००५.

प्रकाशक - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे-४११०२९.

नाना शिंपी गावचा आरोग्यरक्षक आहे. रामूच्या आईने रामूला नानाकडे पाठविले. रामू नानाला घेऊन आला. रामूचे बाबा हात धरून बसले होते. त्यांच्या हातातून खूप कळा येत होत्या. त्यांच्या डोळ्यात पाणी आले होते. ते कण्हत होते. नानाने बाबांचा हात पाहिला.

विंचू बोटाला चावला होता. नांगीचे लहान टोक बोटात अडकलेले होते. नानाने ते हलकेच काढले.





नानाने दाढीचे नवे कोरे पाते आणले होते. विंचू चावला तेथे नानाने असे कापले आणि बोट दाबून धरले. जखमेतून रक्त आले. बाबांनी हात झटकला.

नाना म्हणाला, "ह्या रक्ताबरोबर थोडेसे विष आता निघून जाईल."



नानाने जखमेजवळ आवळपट्टी बांधली. आता बोटातील विष लगेच पसरणार नाही.



नाना आईला म्हणाला, "चिंचेचे दाट पाणी करा." आईने कपभर स्वच्छ पाण्यात थोडी चिंच भिजवली. चिंच पिळून दाट पाणी तयार केले."

नानाने चिंचेचे पाणी जखमेवर सोडले.



नाना म्हणाला, " घाबरू नका. चिंचेच्या पाण्याने आग थांबेल. कळा थांबतील. आग थांबली नाहीच तर दवाखान्यात जावे लागेल."

विंचवाच्या विषाने माणूस मरत नाही. पण विंचू चावल्यावर खूप त्रास होतो. विंचू चावला तेथे आग होते. चटके बसतात असे वाटते. कळा येतात. दवाखान्यात गेल्यावर डॉक्टर औषध टोचतात. मग बरे वाटते.